॥ ज्ञानेश्वरकृत पसायदान ॥

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥

जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥

दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥

वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळीं। भेटतु भूतां ॥

चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणींचे गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषाचे ॥

चन्द्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥

किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इये।
दृष्टादृष्टविजयें। होआवें जी ॥

येथ म्हणे विश्वेशरावो। हा होईल दानपसावो।
येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला ॥

ज्ञानेश्वरी अध्याय १८ ओवी क्रमांक १७९३ ते १८०१

आतां = now
विश्वात्मकें = universal soul
देवें = lord

येणें = by this
वाग्यज्ञें = speech as a sacrifice
तोषवें = be pleased
तोषोनि = having been pleased
मज = to me
द्यावें = give
पसायदान = blessing
हें = this
जे = that
खळांची = wicked
व्यंकटी = crookedness
सांडो = give up
तया = they
सत्कर्मीं = good deeds
रती = liking
वाढो = grow
भूतां = creatures
परस्परें = among themselves
पडो = happen
मैत्र = friendship
जीवाचें = cordial
दुरिताचें = evil
तिमिर = darkness
जावो = vanish
विश्व = world
स्वधर्मसूर्ये = the sun of virtue
पाहो = see
जो = whoever
जें = whatever
वांछील = wish
तो = that one
तें = that
लाहो = get
प्राणिजात = creatures
वर्षत = pour
सकळमंगळीं = all auspicious
ईश्वरनिष्ठांची = devoted to the Lord
मांदियाळी = communities
अनवरत = constant
भूमंडळीं = on this earth
भेटतु = meet
भूतां = creatures
चलां = walking
कल्पतरूंचे = wish-fulfilling trees
आरव = gardens
चेतनाचिंतामणींचे = living wish-fulfilling gems
गांव = village
बोलते = speaking

जे = who
अर्णव = oceans
पीयूषाचे = nectar
चन्द्रमे = moons
जे = who
अलांछन = blemishless
मार्तंड = suns
जे = who
तापहीन = not burning
ते = they
सर्वांही = to all
सदा = always
सज्जन = truth-abiding
सोयरे = kinship
होतु = may become
किंबहुना = what more?
सर्वसुखीं = all blissful
पूर्ण = completely
होऊनि = becoming
तिहीं = three
लोकीं = worlds
भजिजो = worship
आदिपुरुखीं = the primal Person
अखंडित = uninterruptedly
आणि = and
ग्रंथोपजीविये = this book as the life force
विशेषीं = especially
लोकीं = world
इये = this
दृष्टादृष्टविजयें = victorious over the seen and unseen
होआवें = may become
जी = please
येथ = here
म्हणे = says
विश्वेशरावो = Lord of the Universe(guru Nivrittinath)
हा = this
होईल = will happen
दानपसावो = gift of blessing
येणें = by which
वरें = blessing
ज्ञानदेवो = dnyaaneshvara
सुखिया = happy
झाला = became

Now, may the Lord of the Universe be pleased by this sacrificial speech, and thus pleased bestow this blessing.

May the crookedness of the wicked end, and may they grow a liking for virtue.

May the creatures be cordial friends among themselves.

May the darkness of evil vanish, and may the sun of truthful conduct dawn.
May the creatures receive what they wish for.

May the creatures constantly meet communities of the Lord's worshippers, who are ever showering bliss.

Like gardens of wandering wish-fulfilling trees,or like villages of wish-fulfilling gems, or like oceans of nectarine speech,

Akin to blemishless moons, or suns without the burning heat, may these worshippers of truth be liked by all forever.

What more need be said? May all the three worlds become filled completely with bliss, and worship the Primal Lord uninterruptedly.

And O Lord! especially on this earth, may those who cherish this scripture as their very life force, be victorious over the seen and the unseen fruits of action.

Then, the Lord of the Universe, in the form of Guru Nivrittinatha, said 'your offering shall be blessed'. By this blessing dnyaaneshvara attained beatitude.

प्रेषक: सुंदर हट्टंगडी (sunderh@hotmail.com)